# स्थावर मिळकत जाहीर लिलाव नोटीस

तमाम सर्व लोकांस जाहीर करण्यात येते की, ज्ञानदीप को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई, शाखा उंब्रज, पत्ता - उंब्रज, मित्तल चेंबर्स, पहिला मजला, चोरे रोड, ता. कराड, जि. सातारा यांनी खालील नामनिर्देश केलेले सभासद थकबाकीदार आहेत. या थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी संस्थेने मा.उपनिबंधकसो।, सहकारी संस्था, कराड यांचेकडून महाराष्ट्र सहकारी संस्थांचा अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र संपादन केले आहे. या प्रमाणपत्रान्वये व मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चा नियम १०७ अ चे अधिकार प्राप्त झाल्यावरून खालील थकबाकीदारांची स्थावर मिळकत जप्त केली आहे. तसेच निम्नलिखित स्थावर मालमत्तेचा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड१) (सहा अ) अन्वये दिनांक २२/०४/२०२२ रोजी ताबा घेतला आहे. मी निम्न स्वाक्षरीकार वसुली अधिकारी श्री एस. बी. शिर्के संलग्न ज्ञानदीप को-ऑप. क्रेडिट सोसा.लि., मुंबईचे प्राधिकृत अधिकारी म्हणून सदर स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव सोमवार दिनांक ०५/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता ज्ञानदीप को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई, शाखा उंब्रज, मित्तल चेंबर्स, पहिला मजला, चोरे रोड, ता. कराड, जि. सातारा येथे होणार आहे. तरी ज्यांना सदरची मिळकत लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी ज्ञानदीप को ऑप. क्रेडिट सोसा. लि., शाखा उंब्रज यांचेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण लिलावापूर्वी पाहून घ्यावे व त्यांनी लिलावाच्या दिवशी व वेळी हजर रहावे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | कर्जदार व सहकर्जदाराचे नाव | गाव | गट नंबर/मि.क्र. | क्षेत्र | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | सौ. सुरेखा संतोष शिंदे सहकर्जदार श्री. संतोष संपतराव शिंदे | मौजे भुयाचीवाडी, ता. कराड, जि.सातारा | गट नं.१३०/१५२/१५३ मधील घर जुना मि.क्र.१५९/अ, त्याचा नविन मि.क्र.३५७ | ०.००.६५ आर, मधील मिळकत क्षेत्र ७८३.३० चौ. फुट | |
| २ | श्री. संतोष संपतराव शिंदे सहकर्जदार श्री. सचिन संपतराव शिंदे | मौजे भुयाचीवाडी, ता.कराड, जि.सातारा | घर जुना मि.क्र. १५९/ब, त्याचा नविन मि.क्र.३५८ | ५९७.६०.चौ. फुट | |

१) सदर मिळकतीचा जाहीर लिलाव जशी आहे जेथे आहे या तत्वानुसार करण्यात येणार आहे. २) कर्जदारने स्वत: अगर प्रतिनिधीमार्फत लिलावाचे तारखेस, वेळी, ठिकाणी उपस्थित रहावे अन्यथा त्यांचे गैरहजेरीत जाहिर लिलाव केला जाईल नंतर कोणतीही सबब अथवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ३) जाहीर लिलावाच्या नियम, अटी व शर्ती लिलावाचे वेळी समक्ष वाचून दाखविण्यात येतील. ४) सदर मिळकत पहावयाची असल्यास कार्यालयीन वेळेत संस्थेच्या उंब्रज शाखेत संपर्क करावा फो.नं. ९७६६४००७३०. ५) लिलावात भाग घेवू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी बयाणा रक्कम रु. ५०००/-(अक्षरी रु. पाच हजार फक्त) लिलावाचे दिवशी व ठिकाणी सकाळी १०.०० पर्यंत जमा करणे आवश्यक आहे. ६) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे, स्थगित करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवले आहेत.७) सदरची माहिती पुढील वेबसाईटवर उपलब्ध आहे.https://www.dnyandeep.co.in

दिनांक : ०३/११/२०२२

ठिकाण : उंब्रज

सही/- **श्री. एस. बी. शिर्के**

विशेष वसुली व विक्री अधिकारी

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६

नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये अधिकारप्राप्त

शिक्का

CS Scanned with CamScanner